राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
## महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे — ४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१
मेल आयडी - sceapune@gmail.com वेब साईट - scea.maharashtra.gov.in

निवडणूक प्राधान्य

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/बाजार समिती/ 2946/२०२३
दिनांक :- 29/ ०३ /२०२३

वाचावे :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद

२. या प्राधिकरणाकडील आदेश क्रमांक रासनिप्रा/कक्ष-११/कृ.उ.बा.स./निवडणूक प्रक्रिया सुरु करणे/६७७८/२०२२, दिनांक ०६.०९.२०२२

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्रमांक ३६१३/२०२२ मध्ये दाखल दिवाणी अर्ज क्रमांक २८५०/२०२२ मध्ये पारीत केलेले आदेश दिनांक २१.१२.२०२२

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक १५७७२/२०२२ मध्ये पारीत केलेले आदेश दिनांक २२.१२.२०२२

५. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक १३३९३/२०२२ व इतर संलग्न याचीकां मध्ये पारीत केलेले आदेश दिनांक २२.१२.२०२२

६. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/कृ.उ.बा.स./निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलणे/९३७१/२०२२, दिनांक २२.१२.२०२२

७. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्रमांक ३६१३/२०२२ व इतर संलग्न ४३ याचिकांमध्ये पारीत केलेले अंतरीम आदेश दिनांक ५.०१.२०२३.

८. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/बाजार समिती/१०६३/२०२३, दिनांक ८.२.२०२३

९. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १५.०३.२०२३

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रस्तावना**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्याच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्रमांक २ च्या आदेशानुसार राज्यातील दिनांक ३१.१२.२०२२ अखेर निवडणूकीस पात्र असणाऱ्या सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणे बाबत जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांना आदेशीत केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) यांनी प्राधिकरणाकडील वाचावे क्रमांक २ च्या आदेशानुसार २४९ कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता अंतिम मतदार याद्या प्रसिध्द केलेल्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाकडील वाचावे क्रमांक २ च्या आदेशानुसार निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता नामनिर्देशनाची प्रक्रिया दिनांक २३.१२.२०२२ पासून सुरू होणार होती. मात्र अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नव्याने निवडून आलेले प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था सदस्य, बहुउद्देशीय